उत्तर :-

'अक्षरांची पहाट' ही कथा डॉ. प्रकाश खरात यांच्या 'अक्षरांची पहाट' या कथासंग्रहातून घेतलेली आहे. या कथेमध्ये भारतीय महापुरूषांची प्रेरणा घेऊन, आधुनिक काळात शिक्षणाला दिलेले महत्व, दारिद्र्य आणि अज्ञानाच्या काळोखात गडप झालेल्या झेपडीत अक्षरांची पहाट होते हे या कथेचे मुख्य आशयसूत्र आहे.

रामू आणि हरी या दोन्ही भांवडाच्या कुटूंबाची व्यथा मांडणारीही कथा आहे. यांच्या घरातील अठराविश्व दारिद्र्य, बेकारी असल्यामूळे अगदी लहान वयामध्येच त्यांना कचरा वेचून आपआपली पोटाची खळगी भरण्यासाठीं रस्तोरस्ती भटंकती करावी लागली. पहाटेच्या धुसर उजेड़ात हरी आणि रामू वस्त्या, रस्ते यांच्या शोध घेण्यासाठी घराच्या बाहेर पडात. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तिन्ही ऋतुमध्ये ऊन, तारा, पाऊस गारा अंगावर झेलत कचऱ्यांच्या शोधात भटकंती करतात.

प्रत्येक उगवता सुर्य त्यांच्या नशिबी एक मळकं पोतं खांद्यावर घेऊन येत होता. आणि बुडणारा सुर्य त्यात काचेचे तुकडे, प्लॅस्टिकचे तुकडे व रस्त्यावरचे कागदाचे ओझे लादून क्षितीजा पलीकडे निघून हात होता. घराची अत्यंत दैयनीय अवस्था, अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागत नाहीत, अंग झाकावे एवढेही वस्त्र यांच्याजवळ नाहीत प्रचंड बेकारी, दारिद्र्यात त्यांचे कुटूंब आडकले होते. पायामध्ये चप्पल नाही. अशा अवस्थेमध्येही मूले कचरा वेचण्यासाठी वस्त्या व रस्ते यांचा शोध घेत होती. लहान कोवळ्या वयात सुरू झालेला, गल्लीबोळातून भटकणाऱ्या त्यांच्या त्रासाला पर्याय नव्हता. त्यांच्या त्या सिमेंटच्या जंगलातील वनवासापूढे वृक्षांच्या जंगलातील रामाचा वनवास फिका पडत होता. अनेक पिढ्यानपिंढ्या अशा वनवासात जावून मृत्यूमूखी पडल्या पण कचरा वेचणाऱ्याचा इतिहास कुणीही सांगितला नाही.

एकीकडे लहान मुलांचे एक जग सकाळीच शाळेकडे धावत होती आणि ही दुसऱ्या जगाची चिमूरडी पोरं कचऱ्याचे ढीग शोधण्यासाठी बाहेर पडत होते. ही समाजातील आर्थिक विषमता चिमूकल्या मुलांच्या जीवावर बेतलेली होती. त्यांना कोणताही अन्य पर्याय उरलेला नाही. परंतु रामू हा वयाने मोठा असल्यामूळे शाळेच्या मुलांच पोशाख, दप्तर, शाळा विषयी त्याला ओढ निर्माण होते त्याच दिवशी आपला भाऊ हरीला आपण शिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवावे असे रामूला वाटते. हरी शिक्षण घेण्यासाठी तयार होतो परंतू शाळेतील प्रार्थनेचा अर्थ काय? या हरीच्या प्रश्नांने रामूची गच्छंती होते. "भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत" पण ही प्रार्थना फक्त शाळेत पाठांतर म्हणून घेतली जाते या वास्तवात का आणली जात नाही प्रश्न लहान वयात कचरा वेचणाऱ्या मुलांला पडतो.

रामू आणि हरी शिक्षणाच्या स्वप्नातून बाहेर पडतात. रामभरोसे किराणा दुकानाच्या बाजारपेठेमध्ये सकाळी सकाळी येतात. दुकान झाडल्यानंतर कचऱ्याच्या ढीगातल्या अन्नाचा शोध घेतात, शेंगदाणे, सुपारी, गुळ, लवंग, विलायची, खोबरतुकडा, बदाम-काजू, दगउी फुल जे जे मिळेल ते ते खातात आणि पोटभर पाणी पिऊन कचरा वेचायला तयार होतात. दिवाळीच्या दिवसामध्ये अंगाला प्रचंड थंडी बोचत राहते. तशा अवस्थेमध्ये रामू आणि हरी वस्त्या व रस्त्यामध्ये, रस्तोरस्ती कचरा वेचण्यासाठी भटकंती करतात. घरी आल्यानंतर जे जे मिळाले होते ते ते एकत्र करून ठेवतात. आई-वडील आणि स्वतः एकत्र बसून जेवन करतात. हा दररोजचा त्यांचा नित्याचा दिनक्रम होऊन जातो.

घराची अवस्था अत्यंत बिकट, उजेड नाही, पाण्याची सोय नाही, पिण्यासाठी मिळेल तेथील पाणी प्यावे लागते. शहराला लागून असलेल्या झोपडपट्टीतली ही अवस्था अत्यंत बिकट होती. अशा गलिच्छ वस्तीमध्ये रोगराईचे थैमान सुरूच असते. अशा वस्तीमध्ये रामू आणि हरी आपल्या कुटूंबासोबत वास्तव्यास रहात होते. तीन दगडाच्या चुलीवर संसार मांडून दुःखाच्या ऋतुंना स्वतःच्या खांद्यावरूनही तेथील माणसं ढवळून निघालेली होती. अशा या अज्ञान, अंधश्रद्धा, भुखेकंगाल, अज्ञानाने वेढावलेल्या वस्तीमध्ये रामू विद्येची एक पणती लावू पहायचे स्वप्न हरीच्या रूपात पहात होता.

कचरा वेचून घरी आल्यानंतर निर्भिडपणे,संयमीपणे आपल्या आई-उडिलांना हरीच्या शिक्षणाबद्दल सांगतो पण हरीचे वडिल मात्र आपल्या शिकून कोण

नोकऱ्या देणार, कचऱ्यामध्ये जे मिळेल त्यावरच आपले जीवन आहे. शिकलेला माणूस पुन्हा कचरा गोळा करत नाही अशी वडिलांची भूमिका होती. परंतू रामू हा अनुभवाने शहाणा होता. आई-वडिलांना त्यांने शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण हे माणसाला नोकरी देत नाही तर जीवन कसे जगले पाहिजे हे शिक्षण शिकविते असा सूचक संदेश रामू आपल्या कुटूंबातील सदस्यांना देतो. वडिलांच्या मनामध्ये अनेक भावतरल स्वप्न उभी राहतात. माझा मुलगा बाबासाहेबांनी शिक्षण शिकून मोठा व्हावा असे त्यांना वाटते.

अज्ञान, अंधश्रद्धा, बकालवृत्ती, भूक आणि भीक, भटंकती पोटाची खळगी भरण्यासाठी अहोरात्र भटंकती करूनही पोटाला पोटभर जेवण मिळत नाही. जेथे रोगराईचे थैमान आहे अशा व डीमध्ये एका शिक्षणाची पहाट होते. हरी शाळेत जाण्यासाठी तयार होतो. अशा काळ्याकुट्ट अंधाऱ्या वस्तीमध्ये रामूने शिक्षणाची ज्योत तेवत ठेवण्याचे स्वप्न बाळगून ती सत्यामध्ये उतरण्यासाठी स्वतःच्या भावापासून (हरी) सुरू करतो. हा सार्थ अभिमान रामूचा वाटतो. कारण घरामध्ये अठराविश्व दारिद्र्य, अन्न, वस्त्र, निवारा यांची सोय नाही पोटासाठी कोवळ्या वयातच भटकती करावी लागते. अशा बिकट परिस्थितीवर मात्त करून महापुरूषांचा ठेवा जपण्याचे कार्य रामू करतो.

थोडक्यात रामू आणि हरी हे दोन भाऊ घरची आर्थिक परिस्थिती खुपच बिकट, दारिद्र्य आणि अज्ञानाच्या काळोखात गडप झालेली झोपडी पोटाची खळगी भरण्यासाठी रस्तोरस्ती करावी लागणारी भटंकतल मिळेल त्या अन्नाच्या तुकड्यावर दिवस काढणारा रामू महापुरूषांच्या आदर्शामूळे परिवर्तन होवून अज्ञानाच्या काळाकुट्ट अंधारात अक्षरांची पहाट करतो शिक्षणाशिवाय आपल्या तरणोपायच नाही. हा संदेश डॉ. बाबासाहेबांनी दिला त्याच मार्गाने रामू मार्गक्रमण करतो.

ही दोन्ही भांवडे कचरा वेचण्याचे काम करतात. ते प्रत्येक ऋतुवर स्वार होऊन पोटात अन्न ओण्यासाठी धावत राहतात. शिक्षण व खेळण्याच्या वयात खांद्यावर पोतं घेवून शहरातील कचऱ्याचे ढीग शोधतात. डांबरी सडकेच्या कडेला टाकलेल्या कचऱ्यातून मिळेल ते शोधत फिरणे हा त्याचा दिनक्रम होता.

हरी आणि रामू यांचा प्रत्येक उगवता सुर्य एक मळकं पोतं खांद्यावर घेऊन येतो आणि बुडणारा सुर्य त्यात काचेचे तुकडे, प्लॅस्टिकचे तुकडे व रस्त्यावरचे कागद याचे ओझे राहत होते. निवडणुका व स्वातंत्र्याचे सर्व दिवस साजरे करूनही त्यांच्या परिस्थितीमध्ये कोणताही बदल होत नाही. याची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. तीन दगडाच्या चुलीवरतीच कचऱ्यातून मिळालेले अन्न शिजवून खावे लागत होते. लहान मुलांच एक जग सकाळीच शाळेकडे धावत होतं. आणि रामू व हरी मात्र कचऱ्याचे ढीग शोधत घराबाहेर पडत होते. अंगावरती कपडे मळालेले, पायामध्ये चप्पल नाही, थंडीचा कहर अशा अवस्थेमध्ये अंगावर कचऱ्याचे पोते घेऊन घराबाहेर पडण्यासाठी धडपड सूरू असे. एकीकडे श्रीमंतीच श्रीमंती तर एकीकडे पोटाची खळगी भरण्यासाठी अहोरात्र भटकंती करावी लागतआहे. ही आर्थिक समाजामध्ये अगदी बोकाळलेली आहे.

लहान कोवळ्या वयात सुरू झालेला गल्ली बोळातून भटकणाऱ्या त्यांच्या त्रासाला पर्याय उरला नाही. त्यांच्या त्या सिमेंटच्या जंगाला पुढे रामाचा वृक्षातील वनवास फिका होता कचरा वेचत वेचत नवे स्वच्छ कपडे घातलेली शाळेतील मूले त्यावर झालेल्या संस्काराचे अनुभव रामूला पटलेले होते. आर्थिक परिस्थितीमूळे आपण शिक्षण घेऊ शकलो नाही; परंतू आपला भाऊ हरीला शाळा शिकवावी असा निर्धार मनामध्ये बाळगणारा रामू निर्भिडपणे उभा राहतो.

रामभरोसे किराणा दुकानाकडे जाऊन तेथील कचऱ्यामध्ये जेजे मिळेल तेते खाऊन पोटाची भूक भावली जाते. कचऱ्यातून जे मिळेल ते घरी आणले जात होते. कचऱ्या वेचणाऱ्या मुलांना अनेक लोक छळत होते. शिव्या देत होते. अशा अवस्थेमध्ये त्यांना जीवन जगावे लागत होते. घरी आल्यानंतर आई-वडीलांची तीच हालत होती. शहराला लागून एका मेनकापडाच्या छप्परांच्या घरामध्ये तीन दगडाची चूल करून मिळेल ते भाजून खाणे. त्यात पिण्यासाठी पाणी नाही. रोगराईचे थैमान अशा गलिच्छ वस्तीमध्ये राहून हरी व रामू शिक्षणाचे धडे गिरविण्याचे स्वप्न पहातात. शिक्षणाशिवाय जीवन नाही हे रामूला कळते. म्हणून अंधाऱ्या झोपडीत शिक्षणाची पहाट होते.

अक्षराची पहाट ही कथा डॉ. प्रकाश खरात यांच्या 'अक्षराची पहाट' या कथा संग्रहातील आहे. रामू आणि हरी या कथेचे नायक आहेत. रामूच्या घरची आर्थिक परिस्थिती खूपच बिकट आहे. रामू हा कचरा वेचणारा मुलगा अत्यंत गरीब घरातील एक सदस्य आहे. तो प्रत्येक ऋतूवर स्वार होऊन पोटात अन्न ओतण्यासाठी सतत धावत पळत आहे. डांबरी सडकेच्या कडेला टाकलेल्या कचऱ्यातून मिळेल ते शाधीत फिरणे हीच दिनचर्या आहे.

रामू हा सुर्य उगवण्याच्या अगोदर खांद्यावर पोतं घेऊन कचरा गोळा करण्यासाठी जातो ते संध्याकाळी प्लॅस्टिक, लोखंड, काचेचे तुकडे, जे मिळेल ते घेऊन तो घराच्या पालकडे येतो, रामूच्या व्यक्तिचित्राचा विचार करता रामूच्या खांद्यावर नेहमीच एक मळकटलेले पोते व हातात एक थैली असायची. मानेवर रूळलेले डोक्यावरचे केस विस्कटलेले, अंगातील शर्ट अनेक ठिकाणी फाटलेला असायचा. चड्डीला ठिगळे लावून कशीतरी आपली लाज त्यानं स्वातंत्र्यात झाकली होती. पायात काच रूतल्यामूहे तो लंगडत चालला होता. त्याच्यामुळे पायाला जखम किती दिवसांपासून घर करून होती हे कळायला मार्ग नव्हता. आणि तरीही तो तसाच पाय फरपटत बेडरपणे चालत होता.

रामू हा घरामध्ये हरीपेक्षा मोठा होता. आपल्या भावाला सोबत घेऊन कचरा गोळा करण्याचे काम करतो अगदी लहान कोवळ्या वयात सूरू झालेला प्रवास गल्ली बोळातून भटकणाऱ्या त्यांच्या त्रासाला पर्याय नव्हता अत्यंत जिद्दी, मेहनती, निर्भिडपणे आलेल्या परिस्थितीला सामोरे जातो. त्याचे बालपण म्हणजे लहान मुलांचं एक जग सकाळीच शाळेकडे धावत होतं आणि दुसऱ्या जगातील चिमूरडी पोरं कचऱ्याचे ढीग धुंडाळण्यात घराबाहेर पडत होते. ठिकठिकाणच्या मैदानातील कचरा पेटीतील कचरा हातांनी विस्कटत होते.

रामूच्या बालपणापासून रामूला अनेक संकटाना तोंड द्यावे लागते. परंतू दररोज शाळेत जाणारी मुलं पाहून त्याला मोठे कुतूहल वाटते. आणि आपला भावू शाळेत जावा असे उराशी स्वप्न बाळगतो. आपण काम करून भावाला शाळा शिकवण्याचा निर्णय घेतो. रामूला पोटाच्या मार्गानं त्यांना ढाणढणत्या जाळात लोटलं होत. व्यवस्थेनं दारिद्र्याच्या खोल दरीत ढकलूनही माणुसकीच्या सावलीत कूटूंब व समाजात जीवन जगत होता. आंधळ्या वर्तुळात आयुष्याचा गाडा ओढीत होता. जी वस्ती काळ्याकुट्ट अंधारात विद्येची एक पणती लावण्याचे स्वप्न रामूने

पाहिले आहे. आपल्या भावाला आपल्या प्रमाणे काम करू द्यायचे नाही तर त्याला शाळा शिकवावी असा निर्धार करून ते सत्यात उतरवतो रामू हा संयमी, मनमिळावू अन्यायाला निर्दयपणे सामोरे जाणारा कष्टकरी आहे. आलेल्या परिस्थितीला सामोरे जाणे हे त्यांच्या रक्तातील गुण आहे. व्यवस्थे विरुद्ध जावून कार्यकरणारी वृत्ती रामूची होती.

# अक्षरांची पहाट

- डॉ. प्रकाश खरात

**लेखक परिचय :-**

**डॉ. प्रकाश ओंकार खरात (जन्म-१९६६)** :- नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, दिक्षाभूमी येथील मराठी प्रपाठक व विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त. मराठीतील श्रेष्ठ कथाकार म्हणून यांना साहित्यात स्थान आहे. सर्जनशील निर्मिती, वैचारिक लेखनामूळे परिचित.

यांच्या लेखनात सामाजिक वास्तवता, प्रबोधन, संस्कृतीचा अविष्कार व लोकशाहीवादी जीवनमुल्ये आढळतात.

**साहित्य संपदा :-**

अंधाराचा अस्त, अक्षरांची पहाट, प्रवर्तनाचा युगस्पर्श हे प्रसिद्ध. यशोधरा ही कादंबरी, मराठी साहित्य प्रवाह आणि समीक्षा, बौद्धधम्मची चिंतनयात्रा, साहित्य समीक्षाः, बदललेले मापदंड, साहित्याचे समाजशास्त्रीय अंतरंग, हे त्यांचे समीक्षा ग्रंथ प्रसिद्ध. 'अक्षरांची पहाट' या कथा संग्रातून ही कथा निवडली आहे.

भारतीय महापुरूषांची प्रेरणा घेऊन, आधुनिक काळात शिक्षणाला दिलेले महत्त्व, दारिद्र्य आणि अज्ञानाच्या काळोखात गडप झालेल्या झोपडीत अक्षरांची पहाट होते हे या कथेचे आशयसुत्र आहे.